सहाय्यक पोलीस अधीक्षकांची सात अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.
परिविक्षाधीन भारतीय पोलीस सेवा अधिकारी-७० वी तुकडी

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयपीएस-०३१८/प्र.क्र.४७०/पोल-१,
२ रा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २९ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय गृह विभाग क्र. आयपीएस-०३१८/प्र.क्र.४७०/पोल-१, दि.०९.०५.२०१९
२) अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.अपोमसं/प्रशि-२/६९ आर.आर.बॅच/५८३/२०१८/५९५, दिनांक १३.०८.२०१९.

प्रस्तावना :-

भारतीय पोलीस सेवेच्या ७० व्या तुकडीतील ७ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना दि.२५.०५.२०१९ ते दि.३१.०८.२०१९ या प्रशिक्षण कालावधीतील वेतन व भत्त्याकरिता एकूण रु.१६,९८,३५४/- (रुपये सोळा लाख, अठ्ठयान्नव हजार, तीनशे चौपन फक्त) इतका खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर ७ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांपैकी ५ अधिकाऱ्यांची पदस्थापना करण्यात आलेली असून २ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना अद्याप पदस्थापना देण्यात आलेली नाही. पदस्थापना न देण्यात आलेल्या २ परिविक्षाधीन भापोसे अधिकाऱ्यांचे दि.०१.०९.२०१९ ते दि.३०.११.२०१९ पर्यंत वेतन व भत्ते अदा करणेसाठी एकूण रु.४,६१,३७६/- (अक्षरी रु.चार लाख, एकसष्ठ हजार, तीनशे शहात्तर) इतका खर्च अपेक्षित असून या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार आता, शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

भारतीय पोलीस सेवेच्या ७० व्या तुकडीतील पदस्थापना न देण्यात आलेल्या खालील तक्त्यात नमूद २ परिविक्षाधीन भापोसे अधिकाऱ्यांचे दि.०१.०९.२०१९ ते दि.३०.११.२०१९ पर्यंत वेतन व भत्ते अदा करणेसाठी एकूण रु.४,६१,३७६/- (अक्षरी रु.चार लाख, एकसष्ठ हजार, तीनशे शहात्तर) इतका खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रशिक्षणार्थीचे नांव	प्रशिक्षणासाठी नियुक्तीचा जिल्हा
१	श्री. श्रावन दत्त एस.	पालघर
२	श्री. अनुज मिलींद तारे	ठाणे ग्रामीण

२. सदर २ परिविक्षाधीन भापोसे अधिकाऱ्यांचे वेतन व भत्त्यासाठी होणारा खर्च "२०५५-पोलीस-१०९ (०१) जिल्हा पोलीस बल " या उपलेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून वेतन व भत्ते या उद्दीष्टामधून सन २०१९-२० या वर्षीच्या मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय, क्र. पदनि २०१२/ प्र.क्र.६६/ १२/ वित्तीय सुधारणा, दिनांक ११ जुलै, २०१२ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१५४४१३२२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, street=MAIN BUILDING, 2ND FLOOR,MANTRALAY,MUMBAI, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2019.08.29 15:55:48 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३. अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर, अहमदनगर, सोलापूर ग्रामीण, अकोला, चंद्रपूर, पालघर, ठाणे ग्रामीण
८. सह संचालक (तांत्रिक), लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई (२ प्रती).
९. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
१०.सहाय्यक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई.
११.अवर सचिव, कार्यासन बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.वैयक्तिक नस्ती / निवड स्ती (पोल-१).